महाराष्ट्र शासन

महसुल विभाग

# उपविभागीय दंडाधिकारी, वरोरा यांचे कार्यालय

ई-मेल आयडी sdo.warora@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७१७६-२८२०१६

क्रमांक कावि/अ.का./उविदं/२०२०/९६९ दिनांक २० /०८/२०२०

---

वाचा :- (१) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३४ (C) ३४(M)

(२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

(३) मा.जिल्हादंडाधिकारी चंद्रपुर यांचे आदेश क्रमांक एमएजी/कार्या-८/टे-३/सांले/२०२०/६००, दिनांक १७ जुन, २०२०

(४) उपविभागीय दंडाधिकारी **वरोरा** यांचे आदेश क्रमांक कावि/अ.का./उविदं/२०२०/**९३५, दिनांक ०६.०८.२०२०**

(५) तहसिलदार **भद्रावती** यांचे पत्र क्रमांक कावि/अ.का./संकीर्ण/२०२०/३८३, दिनांक ६.८.२०२०

## आदेश

ज्याअर्थी संपुर्ण महाराष्ट्रात कोरोना या विषाणुचा प्रादुर्भावात वाढ झालेली असून या विषाणुमुळे उदभवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपातकालीन परिस्थीती निर्माण झाल्याने राज्यात साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २ , ३, व ४ ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासून लागू करुन मा.जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी चंद्रपुर जिल्हयात सदर विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यास प्रादुर्भाव रोखण्याकरीता करण्यात येणा-या विविध उपाययोजनेच्या अनुषंगाने जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेबाबत नियोजन व समन्वय, क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सोडविणे, क्षेत्रीय स्तरावर आदेश देणे, वाहतूक अडचणी असल्यास क्षेत्रीय स्तरावर संबधीतांना आदेश देणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याकरीता मा.जिल्हाधिकारी चंद्रपुर यांनी उपविभागीय अधिकारी यांची **Sub Divisional Incident Commander** म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी चंद्रपुर जिल्हयात सदर विषाणुचा प्रादुर्भाव होत असल्याने रुग्ण आढळून येत आहेत त्यामुळे ज्या क्षेत्रात कोरोना बाधीत रुग्ण आढळून आला तो परिसर व सदर परिसराजवळील इतर परिसरात कोरोना विषाणुचा संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये यादृष्टीने तात्काळ प्रभावाने कंन्टेनमेंट क्षेत्र (Containment Zone) निश्चीत करुन सदर परिसरातील क्षेत्राच्या सिमा बंद करणे आवश्यक असल्याने व सदर कार्यवाही ही तात्काळ प्रभावाने होणे अपेक्षीत असल्याने मा.जिल्हादंडाधिकारी चंद्रपुर यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा **Sub Divisional Incident Commander** यांना प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) निश्चीत करुन त्या क्षेत्राच्या सीमा तात्काळ प्रभावाने बंद करणे व प्रतिबंधीत क्षेत्रासंबधी इतर कार्यवाही करण्याकरीता **संदर्भिय आदेश क्रमांक ३** अन्वये प्राधिकृत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी उपविभागीय दंडाधिकारी **वरोरा** यांनी त्यांचे **संदर्भिय आदेश क्रमांक ४** अन्वये चंद्रपुर जिल्हयातील **भद्रावती तालुकयातील दफाई नं.१ माजरी कॉलरी, शिवजीनगर ता.भद्रावती भागात** कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव शहरातील इतर भागांत होऊ नये याकरीता खालीलप्रमाणे परिघीय क्षेत्राच्या सिमा बंद करण्याचा आदेश देण्यात आलेला होता.

Sub - Divisional Magistrate

..२..

Scanned with CamScanner

**Containment Zone – दफाई नं. १ माजरी कॉलरी, शिवजीनगर ता.भद्रावती**

- पश्चिम — A-(Entry Exit Point)
- पश्चिम-उत्तर - B –इलियास अहमद सिददीकी यांचे घर
- उत्तर-पूर्व - C-रसुल अहमद सिददीकी यांचे घर
- पूर्व-दक्षिण — D-रसुल अहमद हसन यांचे घर
- दक्षिण-पश्चिम — E-रामप्रसाद बद्री केवट यांचे घर

ज्याअर्थी मुख्याधिकारी नगर परिषद **वरोरा** यांनी त्यांचे **संदर्भिय क्रमांक ५** अन्वये वरील प्रतिबंधीत केलेल्या क्षेत्राचा १४ दिवसाचा कालावधी दिनांक २०.०८.२०२० ला पुर्ण होत असल्याने सदरच्या सिमा बंद केलेल्या पुर्ववत सुरु करण्याचे प्रस्ताव सादर केलेले आहे.

आणि ज्याअर्थी मा.जिल्हादंडाधिकारी चंद्रपुर यांनी त्यांचे संदर्भिय आदेश क्रमांक ३ अन्वये प्राधिकृत केलेले आहे.

**त्याअर्थी मी, सुभाष शिंदे उपविभागीय दंडाधिकारी वरोरा, भद्रावती तालुक्यातील दफाई नं. १ माजरी कॉलरी शिवजीनगर येथील वरीलप्रमाणे प्रतिबंधीत केलेल्या क्षेत्राच्या सिमा या आदेशान्वये पुर्ववत सुरु करण्याचे आदेश देण्यात येते.**

(सुभाष शिंदे)
उपविभागीय दंडाधिकारी
वरोरा

प्रतिलिपी- (१) मा.जिल्हादंडाधिकारी चंद्रपुर यांना माहीतीस सविनय सादर.
(२) उपविभागीय पोलीस अधिकारी **वरोरा** यांना माहीतीस समादराने अग्रेषित.
(३) तहसिलदार **भद्रावती** यांना माहीतीस अग्रेषित.

( सुभाष शिंदे )
उपविभागीय दंडाधिकारी
वरोरा

Sub - Divisional Magistrate
Warora

Scanned with CamScanner